**सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत भविष्यात न्यायालयीन निर्णयामुळे वा अन्य कारणामुळे अपरिहार्य परिस्थितीत वाहतुकीसंदर्भातील निविदा प्रक्रिया स्थगित झाल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत (भाग-४)**

# महाराष्ट्र शासन

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक कंत्राट १०११/प्र.क्र. ७९८/ ना.पु.१६ अ

मंत्रालय विस्तार, मुंबई

**दिनांक : १० जानेवारी, २०१३**

**प्रस्तावना :-**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत भारतीय अन्न महामंडळ ते शासकीय गोदामापर्यंत अन्नधान्य वाहतूक करण्यासाठी निविदेव्दारे कंत्राट निश्चित करण्यात येते. सन २००९ मध्ये नवीन वाहतूक कंत्राटासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असता, सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्य वाहतूक धोरणाबाबत दाखल झालेल्या रिट याचिका क्र. ५०१० / २००९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने नवीन निविदा प्रक्रियेस अंतरीम स्थगिती दिली होती. यामुळे नवीन निविदा प्रक्रिया सुरु होऊ शकली नाही. वाहतूक कंत्राटे संपुष्टात आलेल्या जिल्हयांमध्ये दिनांक ०३.०२.२०१० रोजीच्या शासनपत्रान्वये अन्नधान्य वाहतुकीची पर्यायी व्यवस्था करण्यात आली. नवीन निविदा प्रक्रिया सुरु झाली नसल्याने सदर पर्यायी व्यवस्थेस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. पर्यायी व्यवस्थेअंतर्गत काही जिल्हयातील वाहतुकदारांना शासन तसेच जिल्हास्तरावरुन दरवाढी मंजूर करण्यात आल्या होत्या. सदर दरवाढींच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर जिल्हानिहाय दरात एकसूत्रता आणण्यापूर्वी तसेच भविष्यात न्यायालयीन निर्णयामुळे वा अन्य कारणामुळे अपरिहार्य परिस्थितीत वाहतुकीसंदर्भातील निविदा प्रक्रिया स्थगित झाल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत धोरण तयार करण्याबाबत वित्त विभागाने अभिप्राय दिले होते.त्यानुसार सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

भविष्यात न्यायालयीन निर्णयामुळे वा अन्य कारणामुळे अपरिहार्य परिस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाहतूकीसंदर्भातील निविदा प्रक्रिया स्थगित झाल्यास व कार्यरत वाहतूकदारास दरवाढ मंजूर करावयाची झाल्यास, विभागाने घाऊक किंमत निर्देशांकावर आधारीत दरवाढ मंजूर करावी.

२.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०११०११५१३४९३०६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(बा.बा.नारायणकर)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१ मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२ मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
३ मा. राज्य मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
४ मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
५ प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६ सर्व विभागीय आयुक्त
७ सर्व जिल्हाधिकारी
८ नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा ,मुंबई
९ सर्व उपायुक्त (पुरवठा)
१० सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
११ वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मुंबई
१२ महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई
१३ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१,मुंबई
१४ महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
१५ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
१६ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परीक्षा मंडळ द्वारा - वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मुंबई
१७ वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय,मुंबई
१८ उदयोग, उर्जा व कामगार विभाग, उदयोग-४, मंत्रालय, मुंबई.
१९ प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
२० निवड नस्ती (कार्यासन ना.पु.१६-अ)